# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. १६२/शि.वि./२०१६
दि. २७/०१/२०१६

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :- शिक्षण वारी या उपक्रमास इच्छूक शिक्षक व पालक यांनी भेट देण्याबाबत.**

संदर्भ :- संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पूणे -३० यांचे पत्र क्र.मराशैसंप्रप /शिक्षण वारी/२०१५-१६/४१ दि.२५.०१.२०१६.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा गुणवत्ता विकासाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम राज्यात कार्यान्वित आहे. राज्यातील प्रत्येक मूल शिकावे यासाठी राज्यभरात कार्यान्वित असलेल्या यशस्वी उपक्रमांचे सादरीकरण शिक्षणाच्या वारीत दिग्दर्शित करण्यात आले आहे.

दि.२७ ते ३०.०१.२०१६ या कालावधीत राज्यातील उपक्रमशील शाळांचे ७४०० शिक्षक शिक्षणाच्या वारीस भेटी देवून उपक्रमांची माहिती घेणार आहेत. राज्यातील शिक्षण क्षेत्रातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी आपआपल्या जिल्हयात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाला गती देण्यासाठी या शिक्षणाच्या वारीस दि.३१.०१.२०१६ ला भेट देण्याची विनंती करण्यात आली आहे.

आपल्या शाळेतील उपक्रमशील शिक्षक व शिक्षण क्षेत्रात रूची असलेले पालक या उपक्रमास उपरोक्त कालावधीत भेट देवू शकतात. तरी याबाबत संबंधितास सूचना देवून स्वखर्चाने शिवछत्रपती क्रिडा संकूल बालेवाडी म्हाळूंगे - पूणे येथे उपस्थित रहाण्याबाबत अवगत करावे.

शिक्षणाधिकारी,
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी :-